| **MHSO170008712020** | दाखल तारीख – ११.०३.२०२०<br>नोंदणी तारीख – ११.०३.२०२०<br>निकाल तारीख – **१३.०३.२०२६**<br>**कालावधी – वर्षे महिने दिवस**<br>**०६ ०० ०२** |
|---|---|

**३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) माढा, यांचे न्यायालयात**
**( पिठासीन अधिकारी अनय डी. कुलकर्णी)**

नियमित दिवाणी दावा क्र. ३२१/२०२०
**निशाणी क्रमांक – ५७/अ**

**सौ. विटाबाई नारायण गवळी,**
वय –५६ वर्षे, व्यवसाय – शेती व घरकाम
रा. निरा नरसिंगपूर ता. इंदापूर, जि. पुणे --- **वादी**

**विरुध्द**

१. **श्री. निवृत्ती अनंता राऊत,**
वय –८४ वर्षे, व्यवसाय – शेती,
२. **सौ. कस्तुराबाई निवृत्ती राऊत,**
वय – ७७ वर्षे, व्यवसाय – शेती,
३. **श्री. हरी निवृत्ती राऊत,**
वय – ६० वर्षे, व्यवसाय – शेती,
४. **श्री. नारायण निवृत्ती राऊत,**
वय – ५० वर्षे, व्यवसाय – शेती,
५. **श्री. तुकाराम निवृत्ती राऊत,**
वय – ४७ वर्षे, व्यवसाय – शेती,
प्रतिवादी क्र. १ ते ५ रा. आहेरगाव, ता. माढा, जि. सोलापूर
६. **सौ. केराबाई गोकुळ गवळी,**
वय – ६३ वर्षे, व्यवसाय – गृहिणी,
रा. शेवरे, ता. माढा, जि. सोलापूर --- **प्रतिवादी**

---

**विधीज्ञ – वादीतर्फे सुविद्य विधीज्ञ श्री. एन.एस.कलढोणे.**
**प्रतिवादी क्र. १ ते ४ व ६ तर्फे सुविद्य विधीज्ञ श्री. एस.एच.अजगर.**
**प्रतिवादी क्र. ५ स्वतः हजर.**

---

**:: न्यायनिर्णय ::**
**(दिनांक १३/०३/२०२६)**

**प्रस्तुतचा दावा सरस निरस मानाने वाटप होवून जाहिर ठरवाचा व निरंतर ताकिदीसाठी दाखल केला आहे.**

<u>दावा मिळकतीचे वर्णन–</u>

२) **अ)** तुकडी सोलापूर पोट तुकडी तालुका माढा पैकी मौजे आहेरगाव येथील शेतजमिनीचे वर्णन –

| गट नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|
| | हे. आर | रु. पै. |
| ८४ | १-४२ | १-३० |
| ९२ | ०-३८ | ०-३० |
| ८९ | ०-१३ | ०-१० |

यापैकी प्रतिवादी क्र. १ यांचे नावे असणारे क्षेत्र

येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक मिळकत आतील विहीर, इले, मोटार दगडमाती, पालापाचोळा, झाडझुडपे इ. तद्ंगभूत वस्तू व अधिकारासह

**ब)** तुकडी सोलापूर पोट तुकडी तालुका माढा पैकी मौजे अकाले बु येथील शेतजमिनीचे वर्णन –

| गट नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|
| | हे. आर | रु. पै. |
| ७८ | १-४१<br>पो.ख.००-०३ | २-७० |

येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक मिळकत आतील विहीर, इले, मोटार दगडमाती, पालापाचोळा, झाडझुडपे इ. तद्ंगभूत वस्तू व अधिकारासह

सदर मिळकती दाव्याचा विषय आहे. (यापुढे सोईसाठी सदर मिळकतीस "दावा मिळकती" असे संबोधले आहे.)

**<u>वादीचे थोडक्यात कथन–</u>**

३) वादीचे कथन की, प्रतिवादी क्र. १ व २ पती–पत्नी असून वादी, प्रतिवादी क्र. ३ ते ६ त्यांची मुले–मुली आहेत. प्रतिवादी क्र. १ हे मुळ पुरुष आहेत. दावा मिळकती वादी व प्रतिवादी यांच्या वडिलार्जित हिंदू एकत्र कुटूंबाच्या मिळकती असून वादीचा दावा मिळकतीत १/७ हिस्सा आहे.

४) वादीचे पुढील कथन की, वादीचा व प्रतिवादी क्र. ६ चा दावा मिळकतीतील हिस्सा बुडावा या दुष्ट हेतूने प्रतिवादी क्र. ४ याने प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचेशी संगनमत करुन रे.मु.नं. ९०२/२०१८ हा दावा मिळकतींचे सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी दाखल केला होता. सदर दाव्यात वादी व प्रतिवादी क्र. ६ यांचे परस्पर दिनांक ०८/१२/२०१८ रोजी आपापसात तडजोड करुन बेकायदेशीररित्या वाटपाचा अवार्ड घेतला. सदर दाव्यात वादी व प्रतिवादी क्र. ६ हया प्रतिवादी क्र. १ व२ च्या मुली आहेत ही बाब प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी न्यायालयापासून लपवून ठेवून सदरचा खोटा दावा दाखल केला व बेकायदेशीररित्या तडजोड करुन सदर दावा निकाली केला. त्यामुळे, सदर रे.मु.नं. ९०२/२०१८ या दाव्यास आवश्यक पक्षकाराची बाधा येत असल्याने सदर दाव्यातील हुकूमनामा बेकायदेशीर असून वादीवर बंधनकारक नाही. वादीला दावा मिळकतींचे सात–बारा उतारे काढल्यानंतर सदर फसवणूक झाल्याचे समजले. त्यानंतर दिनांक १८/०२/२०२० रोजी वादीने दावा मिळकतींचे सरस निरस मानाने वाटप करुन मागितले असता प्रतिवादींनी दावा मिळकतींचे वाटप करुन देणेस नकार दिला व दावा मिळकती विक्री करणार आहे अशा धमक्या दिल्या. त्यामुळे, वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे.

**<u>प्रतिवादींचे थोडक्यात कथन</u>** –

५) प्रतिवादी क्र. १ ते ४ व ६ यांनी नि.क्र.२९ अन्वये लेखी कैफियत दाखल केली आहे. प्रतिवादी क्र. ५ यांनी नि.क्र. ३१ वर दावा मान्य करुन त्यांचा हिस्सा काढण्यात यावा अशी विनंती केली आहे. परंतु, त्यांनी लेखी कैफियत दाखल केली नाही म्हणून प्रतिवादी क्र. ५ विरुध्द नि.क्र. ०१ वरील दिनांक ०८.०२.२०२४ रोजीच्या

आदेशान्वये प्रस्तुत दावा विनालेखी कैफियत चालवण्यात येत आहे.

६) प्रतिवादी क्र. १ ते ४ व ६ यांनी वादी प्रतिवादी क्र. १ व २ ची मुलगी व प्रतिवादी क्र. ३ ते ६ ची बहीण असल्याचे नाते संबंध तसेच दावा मिळकती वडीलोपार्जित असल्याचे वादीचे कथन नाकारलेले नाही. परंतु, सदर प्रतिवादींचे कथन की, प्रतिवादी क्र. १ हे वादी व प्रतिवादी यांचे एकत्र कुटूंबाचे कर्ता म्हणून सर्व कामकाज पाहत होते. वादी व प्रतिवादी क्र. ६ यांचे लग्न प्रतिवादी क्र. १ यांनी करुन दिलेले असून वादी व प्रतिवादी क्र. ६ त्यांचे सासरी सुख समाधानाने नांदत होते.

७) प्रतिवादी क्र. १ ते ४ व ६ यांचे पुढील कथन की, सन २०१८ मध्ये दिवाळ सणाच्यावेळी वादी व प्रतिवादी एकत्रित आलेनंतर प्रतिवादी क्र. १ यांनी दावा मिळकतीचे साक्षीदारासमक्ष तोंडी स्वरुपात आपापसात वाटप विभाजन करुन देणेचे ठरवले. त्याप्रमाणे, प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांचे नावे असलेल्या दावा मिळकतीचे मुलांमध्ये वाटप करुन दिले. सदर वाटपात प्रतिवादी क्र. ४ यास आहेरगाव येथील गट नं. ८४ मधील ०० हे ४७ आर, गट नं. ९२ मधील ०० हे १० आर तसेच अकोले (बु) येथील गट नं. ७८ मधील ०० हे ४७ आर अशी मिळकत वाटून दिली.

८) प्रतिवादींचे पुढील कथन की, सदर वाटपात प्रतिवादी क्र. ३ यांना आहेरगाव येथील गट नं. ८४ मधील ०० हे ४७ आर, गट नं. ९२ पैकी ०० हे १० आर तसेच अकाले (बु) येथील गट नं. ७८ पैकी ०० हे ४७ आर अशी मिळकत वाटून देण्यात आली. प्रतिवादी क्र. ५ यांना आहेरगाव येथील गट नं. ८४ पैकी ०० हे ४८ आर, गट नं. ९२ पैकी ०० हे १० आर तसेच अकोले (बु) येथील गट नं. ७८ पैकी ०० हे ४७ आर एवढी मिळकत वाटून दिली आहे. सदर वाटप तोंडी झाले होते. वादी व प्रतिवादी क्र. ६ यांनी त्यांचे विवाहाचा खर्च प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी केला असलयाने तसेच प्रतिवादी क्र. १ व २ यांचा सांभाळ प्रतिवादी क्र. ३ ते ५ करत असल्याने त्यांनी दावा मिळकतीवरील हक्क हिस्सा स्वतःहून स्वखुशीने सोडून दिला होता. वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान असलेल्या नाते संबंधामुळे वादीचे हक्क सोडीबाबत लिखावट केलेली नव्हती.

९) सदर प्रतिवादींचे पुढील कथन की, प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांना वाटून दिलेल्या क्षेत्रावर प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांचे नावाची नोंद नव्हती. त्यामुळे, त्यांना अनेकवेळा अडचणी येऊ लागल्यामुळे प्रतिवादी क्र. ४ याने माढा येथील दिवाणी न्यायालयात रे.मु.नं. ९०२/२०१८ दावा वाटपासाठी दाखल केला होता. प्रतिवादी क्र. ४

याने सदरबाबतची स्पष्ट कल्पना वादी व प्रतिवादी क्र. ६ यांना दिली होती. परंतु, वादी व प्रतिवादी क्र. ६ यांनी, “आम्ही पुर्वीच हक्क सोडून दिला आहे त्यामुळे आम्ही दाव्याचे कामी हजर राहणार नाही तुम्ही आम्हाला पक्षकार करु नका” असे तोंडी सांगितल्याने प्रतिवादी क्र. ४ यांनी त्यांना पक्षकार केले नव्हते. प्रतिवादी क्र. ४ ने वादी व प्रतिवादी क्र. ६ यांना जाणीवपुर्वक वगळलेले नाही. वादीने सदर सर्व बाबी कोर्टापासून लपवून ठेवून प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केला आहे.

१०) प्रतिवादींचे पुढील कथन की, सदर रे.मु.नं. ९०२/२०१८ मध्ये प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचेमध्ये तडजोड होवून सदरचा दावा निकाली करण्यात आला. त्यावरुन, दावा मिळकतीचे हक्कपत्रकी फेरफार नंबर २६४३ व २८०० ने गावचे हक्कपत्रकी नोंद घेण्यात आल्या. वादीने सदर नोंदीविरुध्द उपविभागीय अधिकारी यांचेकडे आर.टी.एस अपील नंबर ३५/२०२० केले होते. सदर अपिल दिनांक ३०/०३/२०२२ रोजी फेटाळण्यात आले आहे. त्यामुळे, यातील प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांच्या नावाची नोंद सात–बारा पत्रकी झाली आहे.

११) प्रतिवादींचे पुढील कथन की, वादी व प्रतिवादी क्र. ६ यांनी दावा मिळकतीतील हक्क सोडून दिलेला आहे. दावा मिळकत कलम १(क) ही मिळकत वादी व प्रतिवादी यांचे एकत्र कुटूंबाची असली तरी वादी व प्रतिवादी क्र. ६ यांनी त्यांचा हिस्सा सोडून दिलेला आहे. त्यामुळे, सदर मिळकतीबाबत रे.मु.नं. ९०२/२०१८ या दाव्यात आवश्यकता नसल्याने सदर मिळकत समाविष्ट केली नव्हती. प्रतिवादींचे पुढील कथन की, वादी व प्रतिवादी क्र. ६ यांनी दावा मिळकतीतील हक्क सोडून दिलेला असल्याने त्यांना वाटप मागणेचा मुळीच हक्क व अधिकार येत नाही. त्यामुळे, वादीला रे.मु.नं. ९०२/२०१८ मधील तडजोड पुरसिस व अर्वाड बाबत वाद उपस्थित करता येणार नाही. प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांनी दावा मिळकत चांगली बागायत बनवलेली आहे. त्यामुळे, वादीचे मनात दावा मिळकतीबाबत वाईट अभिलाषा निर्माण झाल्याने वादीने प्रस्तुतचा दावा काल्पनिक कथानके रचुन केला आहे असे कथन करुन दावा नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

१२) माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी नि.क्र.३३ वर दाव्याचे न्यायनिर्णयाप्रत येण्यासाठी इंग्रजी भाषेत मुद्दे निश्चीत केले आहेत. सदरचे मुद्दे मराठी भाषेत अनुवादीत करुन त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ. क्रं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने दावा मिळकती वादी व प्रतिवादी यांचे वडिलोपार्जित मिळकती आहेत हे शाबित केले आहे काय ?<br>(Does plaintiff proves that, the suit properties are ancestral properties of the plaintiff and defendants ?) | अंशतः होय |
| २. | वादीला दावा मिळकतीत वाटप मागण्याचा हक्क आहे काय ?<br>(Does the plaintiff have right to get the suit properties partitioned ?) | अंशतः होय |
| ३. | वादी दावा मिळकतीचे वाटप मागण्यास पात्र आहे काय? असले तर वादीस कितवा हिस्सा प्राप्त हाईल ?<br>(Is the plaintiff entitled to have partition of the suit properties ? If yes, what would be the respective shares of the parties ?) | अंशतः होय, हिस्सा अंतिम आदेशाप्रमाणे |
| ४. | वादी प्रतिवादींनी दावा मिळकतींचे वाटप विभाजन होईपर्यंत हस्तांतरित करु नये अथवा दावा मिळकतीत त्रयस्थ इसमाचा कसल्याही प्रकारे हक्क प्रस्थापित करु नये या मनाई आदेशाचा अनुतोष मिळणेस पात्र आहे काय?<br>(Is the plaintiff entitled for the relief of injunction to restrain defendants from creating any kind of third party interest in the suit properties till the suit properties are partitioned ?) | होय |
| ५. | वादीने नियमित दिवाणी दावा क्र. ९०२/२०१८ मधील तडजोड अवार्ड/हुकूमनामा कायदेशीर नाही व वादीवर बंधनकारक नाही हे सिध्द केले आहे काय ?<br>(Does plaintiff proves that, the award passed in a compromise in RCS 902/2018 is not legal and not binding upon the share of the plaintiff ?) | होय |

| | | |
|---|---|---|
| ६. | वादी सदर नियमित दिवाणी दावा क्र. ९०२/२०१८ त्यांचे हिश्यावर बंधनकारक नाही असे घोषित करुन मिळणेस पात्र आहे काय ?<br>(Is the plaintiff entitled for the relief of declaration that, the award passed in a compromise in RCS 902/2018 is not legal and not binding upon the share of the plaintiff ?) | होय |
| ७. | प्रतिवादी क्र. १ ते ४ व ६ यांनी दावा मिळकतींचे दावा दाखल होण्यापुर्वीच वाटप झाले होते हे शाबित केले आहे काय ?<br>(Do Defendant No. 1 to 4 and 6 prove that, the suit properties are already partitioned ?) | नाही |
| ८. | आदेश व हुकूमनामा ?<br>(What order, decree and cost?) | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

१३) वादीने दावा सिध्द करणेकामी खालील नमूद साक्षीदार तपासले.

i. विक्रम नारायण गवळी (वादी सा.क्र.१) नि.क्र.३४
ii. नारायण सदाशिव गवळी (वादी सा.क्र.२) नि.क्र.५१

१४) वादीने उपरोक्त तोंडी पुराव्याव्यतिरीक्त खालीलप्रमाणे कागदोपत्री पुराव्यावर भिस्त ठेवली व दि. ०२/०१/२०२५ रोजीचे नि.क्र. ५२ वर पुरसिस दाखल करुन पुरावा बंद केला.

| अनु. क्र. | कागदपत्राचे स्वरूप | नि. क्र. |
|---|---|---|
| १. | नियमित दिवाणी दावा क्र. ९०२/२०१८ या प्रकरणातील नि.क्र. ०१ वरील आदेशाची प्रमाणित प्रत | ४१ |
| २. | नि.दि.दावा क्र. ९०२/२०१८ या प्रकणातील तडजोड पुरसिस व लोकन्यायालयातील अवार्ड/हुकूमनामा | ४२ व ४३ |
| ३. | दावा मिळकत गट क्र. ८४ ची सातबारा उतारा प्रत | ४४ |
| ४. | दावा मिळकत गट क्र. ९२ ची सातबारा उतारा प्रत | ४५ |
| ५. | दावा मिळकत गट क्र. ७८ चा सातबारा उतारा प्रत | ४६ |

| | | |
|---|---|---|
| ६. | दावा मिळकत गट क्र. ८९ चा सातबारा उतारा प्रत | ४७ |
| ७. | दावा मिळकत गट क्र. ८४, ९२ बाबत फेरफार क्र. २६४३ उतारा प्रत | ४८ |

१५) प्रतिवादींना पुरेशी संधी देऊनदेखील त्यांनी तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर सादर केला नाही. त्यामुळे नि.क्र. ०१ वरील आदेशानुसार प्रतिवादींचा पुरावा बंद करण्यात आला.

१६) अभिलेखाचे अवलोकन केले. वादीतर्फे नि.क्र. ५६ वर लेखी युक्तीवाद दाखल करण्यात आला आहे. तसेच, वादीतर्फे सुविद्य विधीज्ञांचा तोंडी युक्तीवाद ऐकण्यात आला. वादीतर्फे सुविद्य विधीज्ञांनी दाव्यातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला व दावा मंजूर करण्याची विनंती केली.

१७) प्रतिवादींना पुरेशी संधी मिळूनसुध्दा प्रतिवादींतर्फे अंतिम युक्तीवाद करण्यात आला नाही. त्यामुळे, प्रस्तुत प्रकरण त्यांची लेखीकैफियतमधील कथन व अभिलेखावरील पुरावा या आधारे निकाली काढण्यात येत आहे.

**मुद्दा क्र. १ व २ करीता–**

१८) मुद्दा क्र. १ व २ एकमेकांशी संलग्नीत असल्याने एकत्रित विचारात घेतले आहेत.

१९) वादीने दावा मिळकती वादी व प्रतिवादी यांचे वडिलोपार्जित मिळकती असून वादीचा सदर दावा मिळकतीमध्ये १/७ हिस्सा असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे, वादीचे सदरचे कथन व दाव्याचे स्वरुप विचारात घेता कायद्यातील स्थित्य तत्वानुसार दावा मिळकती अ मधील गट क्र. ८४, ९२, ८९ व दावा मिळकत ब मधील गट क्र. ७८ मधील मिळकत वादी व प्रतिवादींची वडिलोपार्जित एकत्र हिंदू कुटूंबाच्या मिळकती आहेत हे सिध्द करण्याची जबाबदारी वादीवर आहे. त्यामुळे, वादीने सादर केलेल्या तोंडी व कागदोपत्री पुराव्यावरुन दावा मिळकती वडिलोपार्जित आहे हे सिध्द होत आहे किंवा कसे हे पाहणे आवश्यक आहे.

२०) वादीने कथनाप्रमाणे दावा मिळकती वडिलोपार्जित आहेत हे सिध्द करणेकामी विक्रम नारायण गवळी (वादी सा.क्र. १) व नारायण सदाशिव गवळी (वादी सा.क्र. २) यांची साक्ष नोंदवली आहे. तसेच, उपरोक्त नमूद कागदोपत्री पुराव्यावर भिस्त ठेवली आहे.

२१) वादीने (सा.क्र. १) यांची साक्ष कुलमुखत्यारपत्र (नि.क्र. ४०) आधारे नोंदवण्यात आली आहे. सदर साक्षीदारास वादीतर्फे साक्ष देणेसाठी प्रतिवादींनी आक्षेप घेतला नसल्याचे दिसून येते. सदर विक्रम (वादी सा.क्र. १) वादीचा मुलगा असून सदाशिव (वादी सा.क्र. २) वादीचे पती व सदर विक्रमचे वडील आहेत. सदर विक्रम (वादी सा.क्र. १) यांचे पुरावा शपथपत्र (नि.क्र.३४) मधील मजकूर दाव्याच्या कथनाची पुनरावृत्ती आहे. सदाशिव (सा.क्र. २) यांनी वादीचे कथनास सुसंगत अशी साक्ष दिली आहे. प्रतिवादींतर्फे सदर वादीचे दोन्ही साक्षीदारांचा उलटतपास घेण्यात आला आहे. परंतु, सदर वादीचे दोन्ही साक्षीदारांनी प्रतिवादींचे लेखीकैफियत आधारे विचारण्यात आलेले सुचित प्रश्न स्पष्टपणे नाकारले आहेत.

२२) प्रस्तुत दावा वादीने दावा मिळकतींचे वाटप करुन मिळणेकामी दाखल केला असल्याने सदर दाव्याचे स्वरुप विचारात घेता याठिकाणी नमूद करणे आवश्यक आहे की, कायद्यातील स्थित्य तत्वानुसार दावा मिळकती वडिलोपार्जित आहेत किंवा कसे हे सिध्द होणेकामी तोंडी पुरावा पुरेसा नसून कागदोपत्री पुराव्याचा दुजोरा प्राप्त होणे आवश्यक आहे. त्यामुळे, प्रस्तुत प्रकरणात कागदोपत्री पुराव्याआधारे दावा मिळकती वादी व प्रतिवादींचे वडिलोपार्जित आहेत हे सिध्द होते किंवा कसे हे पाहणे क्रमप्राप्त ठरते.

२३) वादीने कथनापुष्ट्यर्थ दाखल केलेल्या नियमित दिवाणी दावा क्र. ९०२/२०१८ या प्रकरणातील दावा प्रत (नि.क्र. ४१), तडजोड पत्र (नि.क्र.४२) व अवार्ड/हुकूमनामा प्रत (नि.क्र.४३) याचे अवलोकन केले असता, सदरचा दावा प्रतिवादी क्र. ४ यांनी प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ यांचेविरुध्द मौजे आहेरगाव येथील गट क्र. ८४, ९२ व मौजे अकोले बुद्रुक येथील गट क्र. ७८ मधील मिळकतींचे सरस निरस मानाने वाटप करुन मिळणेबाबत दाखल केला असल्याचे दिसून येते. सदर दाव्यात या दाव्यातील नमूद मौजे आहेरगाव येथील गट क्र. ८९ मधील मिळकत समाविष्ट नसल्याचे दिसून येते.

२४) वादीने प्रस्तुत दाव्यात दाखल केलेल्या वंशावळ व कथन केलेल्या नातेसंबंधावरुन प्रतिवादी क्र. ३ ते ६ हे वादीचे सख्खे बहिण भाऊ असून प्रतिवादी क्र. १ व २ हे त्यांचे आई–वडील असल्याचे दिसून येते. प्रतिवादींनी सदरचे नातेसंबंध नाकारलेले नाही.

२५) सदरचा नियमित दिवाणी दावा क्र. ९०२/२०१८ (नि.क्र. ४१) याचे अवलोकन केले असता, प्रतिवादी क्र. ४ यांनी त्यांच्या सख्ख्या बहिणी म्हणजेच वादी व

प्रतिवादी क्र. ६ यांना वगळून आई–वडील व सख्खा भाऊ यांचेविरुध्द दावा दाखल केला. त्यानंतर, सदर दाव्यात वादी व प्रतिवादी क्र. ६ यांचे उपरोक्ष तडजोड (नि.क्र. ४२) करुन वडिलांच्या (प्रतिवादी क्र. १ चे नावे) असलेल्या मिळकतींचे लोकन्यायालयात तडजोडी आधारे फक्त भावा–भावांमध्ये वाटप केले व तसा लोकन्यायालयाचा अवार्ड/हुकूमनामा (नि.क्र. ४३) स्वतःच्या हक्कात करुन घेतला असे दिसून येते.

२६) वादी व प्रतिवादी क्र. ६ हया प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या मुली आहेत. सदर नातेसंबंध प्रतिवादींनी नाकारलेले नाही. हिंदू उत्तराधिकार अधिनियम कलम ६ चे अवलोकन केले असता मुलींना सुध्दा मुलांप्रमाणे वडिलोपार्जित मिळकतीत समान हक्क प्राप्त होतो असे स्पष्ट होते. सदर दिवाणी दावा क्र. ९०२/२०१८ या दाव्यात मौजे आहेरगाव येथील गट क्र. ८४, ९२ व मौजे अकोले बुद्रुक येथील गट क्र. ७८ मधील प्रतिवादी क्र. १ यांच्या नावे असलेल्या दावा मिळकती हया वडिलोपार्जित मिळकती आहेत असे प्रतिवादींनी मान्य केले असल्याचे दिसून येते. सदर दावा मिळकती वादीचे कथनाप्रमाणे प्रतिवादींनीच वडिलोपार्जित असल्याचे मान्य व कबूल केले असल्याने सदर मिळकती वादी व प्रतिवादींचे वडिलोपार्जित मिळकती असल्याचे सिध्द होते.

२७) प्रतिवादींनी लेखी कैफियतीमध्ये वादी व प्रतिवादी क्र. ६ यांनी प्रतिवादी क्र. १ नी त्यांचे लग्न लावून दिले असल्याने त्यांनी दावा मिळकतीवरील हक्क सोडून दिला आहे असे कथन केले आहे. परंतु, सदरचे कथन वादीचे साक्षीदारांनी उलटतपासात नाकारले आहे. प्रतिवादींनी सदरचे कथन सिध्द करणेकामी स्वतःची साक्ष नोंदवणे आवश्यक होते. परंतु, पुरेशी संधी असून देखील प्रतिवादींनी पुरावा शपथपत्र दाखल केले नाही व वादीला त्यांचा उलटतपास घेण्याची संधी दिली नाही. तसेच, वादी साक्षीदारांच्या उलटतपासात प्रतिवादींना मदत होईल असे कुठलेही वक्तव्य अभिलेखावर आले नाही. त्यामुळे, प्रतिवादींचे केवळ मोघम कथन पुराव्या अभावी वादीने दावा मिळकतीवरील हक्क सोडला आहे असे ग्राहय धरण्यास पुरेसे ठरत नाही. त्यामुळे, हिंदू उत्तराधिकार अधिनियम कलम ६ अन्वये मुलगी या नात्याने वादीचा सुध्दा मौजे आहेरगाव येथील गट क्र. ८४, ९२ व अकोले बुद्रुक येथील गट क्र. ७८ मधील नमूद दावा मिळकतींमध्ये समान हक्क असून वादीस सदर मिळकतींचे वाटप करुन मागण्याचा हक्क असल्याचे स्पष्ट होते.

२८) वादीने मौजे आहेरगाव येथील गट क्र. ८९ मधील ० हे १३ आर मिळकत वादी व प्रतिवादी क्र. १ ते ६ यांची वडिलोपार्जित मिळकत आहे असे कथन करुन सदर

मिळकतीचे सुध्दा वाटप करुन मागितले आहे. परंतु, सदर मिळकत नियमित दिवाणी दावा क्र. ९०२/२०१८ या दाव्यात दावा मिळकती सदरात समाविष्ट नसल्याचे दिसून येते. त्यामुळे, सदर मिळकत वडिलोपार्जित आहे हे वादीस सिध्द करणे क्रमप्राप्त आहे.

२९) वादीने सदर गट क्र. ८९ मधील दावा मिळकतीबाबत ७/१२ उतारा (नि.क्र. ४७) अभिलेखावर दाखल केला आहे. सदर ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता, सदर मिळकत प्रतिवादी क्र. १ सह एकूण १२ लोकांमध्ये सामाईक असल्याचे दिसून येते. सदर प्रतिवादी क्र. १ चे नाव इतरांसह फेरफार उतारा नोंद क्र. ८२५ अन्वये ७/१२ उता–यावर नोंदवण्यात आले असल्याचे दिसून येते. वादीने सदर फेरफार उतारा प्रत अभिलेखावर दाखल करणे अभिप्रत होते. परंतु, वादीने सदर फेरफार ८२५ ची प्रत दाखल केली नाही. सदर ७/१२ उता–यावरुन सदर मिळकत प्रतिवादी क्र. १ ची वडिलोपार्जित मिळकत आहे याचा बोध होत नाही. त्यामुळे, वादी प्रतिवादी क्र. १ ची मुलगी असली तरी सदर मिळकत वडिलोपार्जित असल्याचे कागदपत्रांवरुन दिसून येत नसल्याने वादीस वडील हयात असताना तिला सदर मिळकतीत हक्क प्राप्त होत नाही असे दिसून येते. त्यामुळे, वादी सदर दावा मिळकतीचे वाटप मागणेस पात्र नसल्याचे स्पष्ट होते. सबब, उपरोक्त कारणमीमांसेवरुन मौजे आहेरगाव येथील गट क्र. ८४, ९२ व मौजे अकोले बुद्रुक येथील गट क्र. ७८ मधील नमूद दावा मिळकती वादी व प्रतिवादींच्या वडिलोपार्जित मिळकती आहेत व वादीचा सदर मिळकतींमध्ये समान हक्क आहे हे सिध्द होत असून मौजे आहेरगाव येथील गट क्र. ८९ मधील मिळकत वडिलोपार्जित असल्याचे सिध्द होत नसल्याने, मुद्दा क्र. १ व २ चे निष्कर्ष दावा मिळकत गट क्र. ८४, ९२ व ७८ या मिळकतींच्या हद्दीपर्यंत होकारार्थी व दावा मिळकत गट क्र. ८९ बाबत नकारार्थी नोंदवण्यात येतात.

**<u>मुद्दा क्र. ५ व ६ करीता</u>–**

३०) वादीने नियमित दिवाणी दावा क्र. ९०२/२०१८ यामधील तडजोड अवार्ड/हुकूमनामा बेकायदेशीर आहे असे कथन करुन सदर हुकूमनामा वादीचे हिस्स्यावर बंधनकारक नाही असे घोषित करणेचा अनुतोष मागितला आहे. सदरचा दावा प्रतीचे (नि.क्र. ४१) चे अवलोकन केले असता, सदर दावा दिनांक ०६/१२/२०१८ रोजी दाखल केला असल्याचे दिसून येते. सदर दाव्यात वादी ही प्रतिवादी क्र. १ ची मुलगी आहे हे प्रतिवादींना मान्य असताना वादीला सदर दाव्यात समाविष्ट केले नसल्याचे दिसून येते.

त्यामुळे, सदर दाव्यात वादीला व प्रतिवादी क्र. ६ ला म्हणजेच प्रतिवादी क्र. १ व २ चे मुलींना लपवून त्यांचे उपरोक्ष प्रतिवादी क्र. १ यांचे नावे असलेल्या वडिलोपार्जित दावा मिळकतींचे तडजोडी आधारे वाटप करुन घेतले व लोकन्यायालयात तसा तडजोड हुकूमनामा/अवार्ड (नि.क्र. ४३) प्रतिवादींच्या हक्कात करुन घेवून वादीचा वडिलोपार्जित मिळकतीवरील हक्क डावलला असल्याचे दिसून येते.

३१) प्रतिवादींनी लेखी कैफियत (नि.क्र. २९) मध्ये कथन केले आहे की, वादी व प्रतिवादी क्र. ६ यांनी दावा मिळकतीवरील हक्क सोडला असल्याने त्यांना सदर दाव्यात समाविष्ट केले नव्हते. सदर कथनाच्या अनुषंगाने प्रतिवादींनी साक्षीपुरावा देणे आवश्यक होते. परंतु, प्रतिवादींनी साक्षीपुरावा दिला नाही. तसेच, सदर कथनाच्या अनुषंगाने याठिकाणी नमूद करणे आवश्यक आहे की, सदर दाव्यामध्ये या दाव्यातील वादी व प्रतिवादी क्र. ६ (बहिणींनी) दावा मिळकतीवरील हक्क सोडला आहे असे कथन नमूद करणे क्रमप्राप्त होते. परंतु तसा ऊहापोह सदर दाव्यात केला नसल्याचे दिसून येते. याउलट, सदर दाव्यातील वंशावळ पाहिली असता, वादी व प्रतिवादी क्र. ६ हया प्रतिवादी क्र. १ व २ च्या मुली असताना त्यांना वंशावळीत दर्शवले नसल्याचे दिसून येते. यावरुन, मुलींना म्हणजेच वादी व प्रतिवादी क्र. ६ यांना लपवून त्यांचे उपरोक्ष न्यायालयाची दिशाभूल करुन प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी लोकन्यायालयात तडजोड अवार्ड/हुकूमनामा करुन घेतला असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे, सदरचा दाव्यात वादीला समाविष्ट केले नसल्याने व तिच्या उपरोक्ष तिचा हक्क डावलून न्यायालयाची दिशाभूल करुन हुकूमनामा करुन घेतला असल्याने सदरचा हुकूमनामा/अवार्ड वादीवर बंधनकारक नसल्याचे सिध्द होते. सबब, मुद्दा क्र. ५ व ६ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवण्यात येतात.

**<u>मुद्दा क्र. ३ करीता</u>–**

३२) मुद्दा क्र. १ व २ मधील सविस्तर चर्चेवरुन मौजे आहेरगाव येथील गट क्र. ८४, ९२ व गट क्र. ७८ मधील दावा मिळकती वादी व प्रतिवादीचे वडिलोपार्जित मिळकती आहेत. तसेच, सदर मिळकतीवर वादीला वाटप मागण्यास हक्क प्राप्त होतो असे सिध्द होत आहे. त्यामुळे, वादी सदर मिळकतीमध्ये वाटप मागण्यास पात्र असल्याचे सिध्द होते.

३३) वादीने प्रस्तुत दाव्यात मौजे आहेरगाव येथील गट क्र. ८९ मधील मिळकतीचेसुध्दा वाटप करुन मागितले आहे. परंतु, सदर मिळकत वादी व प्रतिवादी क्र. १

ची वडिलोपार्जित मिळकत आहे हे सिध्द झाले नसल्याने वादी तिचे वडील म्हणजेच प्रतिवादी क्र. १ चे हयातीत सदर मिळकतीचे वाटप करुन मागण्यास पात्र नसल्याचे स्पष्ट होते. तसेच, सदर मिळकतीच्या ७/१२ उतारा (नि.क्र.४७) चे अवलोकन केले असता, सदर मिळकत प्रतिवादी क्र. १ सह इतर १२ खातेदारांना आवश्यक पक्षकार म्हणून समाविष्ट करणे आवश्यक होते. परंतु, वादीने दाव्यात सदर इसम आवश्यक पक्षकार नाहीत असे कथन करुन त्यांना समाविष्ट केले नाही असे कथन केले आहे. सदर कथनाच्या अनुषंगाने याठिकाणी नमूद करणे आवश्यक आहे की, सदर दावा मिळकत सामाईक असल्याने सदर दावा मिळकतीबाबतचा पारित होणारा हुकूमनामा त्यांच्यावर सुध्दा बंधनकारक राहणार आहे. त्यामुळे सदर दावा मिळकतीतील सह खातेदार सुध्दा प्रस्तुत दाव्यास आवश्यक पक्षकार होतात. परंतु, वादीने सदर खातेदारांना दाव्यात समाविष्ट केले नाही. त्यामुळे, सदर इतर सह खातेदारांच्या उपरोक्ष वादी सदर दावा मिळकतीचे वाटप करुन मागण्यास पात्र नसल्याचे सिध्द होते.

३४) वादी उपरोक्त चर्चेवरुन मौजे आहेरगाव येथील गट क्र. ८४, ९२ व मौजे अकोले येथील गट क्र. ७८ मधील नमूद दावा मिळकतींचे वाटप करुन मागण्यास पात्र आहे असे सिध्द झाल्याने वादी व प्रतिवादींचा कितवा हिस्सा येतो हे पाहणे आता आवश्यक आहे.

३५) सदर दावा मिळकतींचे ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता दावा मिळकती मुळच्या प्रतिवादी क्र. १ चे नावे आहेत असे दिसून येते. वादी व प्रतिवादी क्र. ३ ते ६ हे प्रतिवादी क्र. १ व २ चे अपत्य व आपापसात सख्खे बहीण भाऊ आहेत. वादी व प्रतिवादी क्र. ३ ते ६ हे मुल–मुली व प्रतिवादी क्र. १ व २ हे आई–वडील असल्याने वादी व प्रतिवादींना समान हिस्सा प्राप्त होतो. त्यामुळे, वादी व प्रतिवादी असे एकूण ०७ इसम असल्याने वादी व प्रतिवादींना प्रत्येकी समान हिस्सा प्रमाणे १/७ हिस्सा प्राप्त होतो असे स्पष्ट होते. सबब, मुद्दा क्र. ३ चे निष्कर्ष दावा मिळकत गट क्र. ८४, ९२ व ७८ हया मिळकतीच्या हद्दीपर्यंत होकारार्थी नोंदवून वादीचा सदर मिळकतीत १/७ हिस्सा आहे असा निष्कर्ष नोंदवण्यात येतो.

**मुद्दा क्र. ७ करीता**–

३६) प्रतिवादी क्र. १ ते ४ व ६ यांनी दावा मिळकतींचे तोंडी वाटप झाले आहे व वादीने दावा मिळकतीवरील हक्क सोडला आहे असे कथन लेखीकैफियत मध्ये केले आहे.

सदरचे कथन वादी साक्षीदारांनी उलटतपासात नाकारले आहे. प्रतिवादींनी सदर कथनाबाबत साक्षीपुरावा दिला नाही. सदर प्रतिवादींनी सदर कथनाबाबत साक्षीपुरावा देणे आवश्यक होते. त्यामुळे, सदर मोघम कथना आधारे वादी व प्रतिवादींमध्ये दावा मिळकतींचे वाटप झाले होते असे पुराव्याअभावी ग्राहय धरणे संयुक्तिक होणार नाही. सबब, मुद्दा क्र. ७ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवण्यात येते.

<u>**मुद्दा क्र. ४ करीता**</u>–

३७) वादीने दावा मिळकतीचे वाटप होईपर्यंत प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये कसल्याही प्रकारे ति–हाईत इसमाचा हक्क प्रस्थापित करु नये असा मनाई हुकूम मिळण्याच्या अनुतोषाची मागणी केली आहे. मुद्दा क्र. १, २, ५ व ६ मधील केलेल्या सविस्तर विवेचनानुसार वादीचा मौजे आहेरगाव येथील गट क्र. ८४, ९२ व मौजे अकोले बुद्रुक येथील गट क्र. ७८ मधील दावा मिळकतींमध्ये १/७ हिस्सा आहे, तसेच प्रतिवादींनी दाखल केलेला नियमित दिवाणी दावा क्र. ९०८/२०१८ व त्यावरील तडजोड अवार्ड/हुकूमनामा वादीच्या उपरोक्ष झाल्याने वादीवर सदरचा तडजोडनामा बंधनकारक नाही असे सिध्द झाले आहे.

३८) परंतु, दावा मिळकतींचे सातबारा उतारा (नि.क्र. ४४ ते ४६) याचे अवलोकन केले असता सदर दावा मिळकतींच्या सातबारा उता–यावर सदर दाव्यातील हुकूमनाम्या आधारे प्रतिवादींचे नावाची नोंद सदर दावा मिळकतींच्या ७/१२ उता–यावर झाली असल्याचे दिसून येते. त्यामुळे, प्रस्तुत प्रकरणात दावा मिळकतीचे वाटप व विभाजन होवून वादीचा स्वतंत्र १/७ हिस्सा मिळणेची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत प्रतिवादी दावा मिळकतींमध्ये ति–हाईत इसमांचा हक्क प्रस्थापित करण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे झाले तर, वादीचा सदर दावा मिळकतींवरील हक्क डावलला गेला असल्याने वादीचेच जास्त नुकसान होण्याची शक्यता आहे. परंतु, प्रतिवादींविरुध्द सदर मनाई हुकूम दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होईल असे दिसून येत नाही. त्यामुळे, वादी सदर दावा मिळकतींचे वाटप व विभाजन होवून मिळेपर्यंत दावा मिळकतीत प्रतिवादींनी कसल्याही प्रकारे हस्तांतरण करु नये व ति–हाईत इसमाचा हक्क प्रस्थापित करु नये असा मनाई हुकूम मिळणेच्या अनुतोषास पात्र असल्याचे सिध्द होते. सबब, मुद्दा क्र. ४ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवण्यात येते.

**मुद्दा क्र. ८ करीता** –

३९) मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष अंशतः होकारार्थी, मुद्दा क्र. ४, ५ व ६ चे निष्कर्ष होकारार्थी व मुद्दा क्र. ७ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवल्याने दावा अंशतः मंजूर होण्यास पात्र असल्याचे दिसून येते. त्यामुळे, दावा दाखल होवून निकाली होईपर्यंतचा कालावधी विचारात घेता प्रस्तुत दावा खर्चासह अंशतः मंजूर होणेस पात्र असल्याचे स्पष्ट होते. सबब, पुढीलप्रमाणे आदेश–

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | प्रस्तुत दावा खर्चासह अंशतः मंजूर करण्यात येतो. |
| २. | वादी व प्रतिवादी क्र. १ ते ६ यांचा मौजे आहेरगाव, ता. माढा येथील गट क्र. ८४, ९२ व मौजे अकोले बु. ता. माढा येथील गट क्र. ७८ मधील नमूद दावा मिळकतींमध्ये प्रत्येकी १/७ हिस्सा असल्याचे घोषित करण्यात येते. |
| ३. | नियमित दिवाणी दावा क्र. ९०२/२०१८ मधील तडजोड हुकूमनामा/अवार्ड वादीच्या मौजे आहेरगाव, ता. माढा येथील गट क्र. ८४, ९२ व मौजे अकोले बु. ता. माढा येथील गट क्र. ७८ मधील नमूद दावा मिळकतींमधील १/७ हिस्स्यावर बंधनकारक नाही असे घोषित करण्यात येते. |
| ४. | प्रतिवादींनी स्वतः अथवा इतर कोणाही मार्फत वादीस सदर मौजे आहेरगाव, ता. माढा येथील गट क्र. ८४, ९२ व मौजे अकोले बु. ता. माढा येथील गट क्र. ७८ या दावा मिळकतींमध्ये प्रस्तुत दाव्यातील हुकूमनाम्याची अंमलबजावणी होवून वादीचा १/७ हिस्याचा पृथक कब्जा मिळेपर्यंत सदर दावा मिळकती कोणासही कसल्याही प्रकारे हस्तांतरित करु नये अथवा इतर कोणाचा कसल्याही प्रकारे ति–हाईत हक्क, स्वारस्य निर्माण करु नये असे मनाई हुकूमाव्दारे आदेशीत करण्यात येते. |
| ५. | मौजे आहेरगाव, ता. माढा येथील गट क्र. ८९ मधील दावा मिळकतीबाबत दावा नामंजूर करण्यात येतो. |
| ६. | येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा. |

| | |
|---|---|
| ७. | वादीस सदर मौजे आहेरगाव येथील गट क्र. ८४, ९२ व अकोले बु. येथील गट क्र. ७८ मधील दावा मिळकतीमध्ये १/७ हिस्स्याचा पृथक कब्जा वाटप होवून मिळणेसाठी प्रस्तुत हुकूमनामा दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ५४ अन्वये जिल्हाधिकारी यांचेकडे अंमलबजावणी कामी पाठवण्यात यावा. |
| | (सदरचा न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला) |

ANAY DNYANESH KULKARNI

Digitally signed by ANAY DNYANESH KULKARNI
Date: 2026.03.16 12:59:43 +0530

दिनांक – १३/०३/२०२६

(**अनय डी. कुलकर्णी**)
३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
माढा

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that, the contents of this P.D.F. file Order/Judgment is same word to word, as per the original order/judgment. | | |
| Name of Stenographer | : | M.P.Dixit Grade-3 |
| Court Name | : | 3rd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Madha. |
| Order/Judgment signed by the Presiding Officer on | : | 13/03/2026 |
| Order/Judgment uploaded on | : | 13/03/2026 |